# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300, 📠: 07172-255800 ✍: 7447744100 (PRO)


# पोलीस वार्तापत्र

## चंद्रपूर पोलीस दलाची अवैध धंदयाविरुध्द मोठी कारवाई :

### स्थानिक गुन्हे शाखेच्या वेगवेगळया पथकाने जिल्हयात ठिकठिकाणी धडक कारवाई करुन सुंगधीत तंबाखू, अवैध रेती वाहतुक, गांजा तस्करी करणाऱ्यांवर कारवाई,

### एकुण १५ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

जिल्ह्यातील अवैध धंदे, प्रतिबंधित सुगंधीत तंबाखूची विक्री आणि गौण खनिजांची चोरी रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी १८ मे २०२६ रोजी जिल्हाभरात धडक कारवाई केली. या मोहिमेत एकूण लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून अनेक आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कारवायांचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे :

**१. सुगंधीत तंबाखू व गुटखा विरोधी कारवाया (सिंदेवाही, मूल व रामनगर)**

- सिंदेवाही येथील प्रतिबंधित सुगंधी तंबाखू व इतर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या इसमावर छापा टाकून **₹३७,२२५/-** किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सिंदेवाही पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता (BNS) व अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला असून आरोपी शाम परमानंद छत्रवाणी (रा. सिंदेवाही) याला अटक केली आहे, तर आरोपी जयसुख ठक्कर (रा. बल्लारपूर) हा फरार असुन त्याचा शोध सुरु आहे.
- सिंदेवाही पोलीस स्टेशन हद्दीतच दुसऱ्या एका मोठ्या कारवाईत **₹३,७६,०८४/-** किमतीचा १४ वेगवेगळ्या प्रकारचा प्रतिबंधित सुगंधीत तंबाखू, गुटखा आणि पानमसाला जप्त करण्यात आला. यात आरोपी नरेश करमचंद भवानी (रा. सिंदेवाही) याला अटक करण्यात आली असून फरार आरोपी जयसुख ठक्कर (रा. बल्लारशा) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.
- पोलीस स्टेशन मूल हद्दीतील राजोली (ता. मूल) येथील आरोपी दिलीप ईश्वर शेंडे (वय ५३) याच्याकडून विविध कंपन्यांचा प्रतिबंधित सुगंधीत हुक्का शिशा तंबाखू व पान मसाला असा एकूण **₹१६,२५०/-** किमतीचा मुद्देमाल जप्त करून मूल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.
- पोलीस स्टेशन रामनगर हद्दीतील इंदिरानगर भागात सुगंधीत तंबाखूची विक्री करणाऱ्या आरोपी नामे सिद्धांत माधव गोंडाने (वय ३२) व मोहम्मद अखिल शकील शेख (वय ४५) यांना अटक करून त्यांच्याकडून एकूण **₹१,३५,४५५/-** किमतीचा सुगंधीत तंबाखू व हुक्का शिशा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील मुख्य आरोपी वासिम झिमरी (रा. घुटकाळा वॉर्डए चंद्रपूर) हा फरार असुन त्याचा शोध सुरु आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300, 📠: 07172-255800 ✍: 7447744100 (PRO)


**भद्रावती हद्दीत अवैध रेती उपसा व वाहतुकीवर कारवाई:**

स्थानिक गुन्हे शाखेच्या वरोरा पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे भद्रावती हद्दीतील मौजा चंदणखेडा चोरा नाला येथे छापा टाकला. तेथून अवैधरित्या गौण खनिजाचे (रेती) चोरटे उत्खनन व वाहतूक करताना ₹१०,००,०००/- किमतीचे दोन विना क्रमांकाचे ट्रॅक्टर (टॉलीसह) आणि ₹१०,०००/- किमतीची दोन ब्रास रेती असा एकूण **₹१०,१०,०००/-** रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी सुरज गजानन जिवतोडे (वय २१, रा. शेगाव खुर्द) व निलेश संतोष गोहणे (वय २९, रा. चंदणखेडा) यांना ताब्यात घेण्यात आले असून फरार आरोपी विकास ईश्वर धांडे (रा. बोरगाव) याच्याविरुद्ध भद्रावती पोलीस ठाण्यात BNS व जमीन महसूल कायदा आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**रामनगर हद्दीत अमली पदार्थ (गांजा) विरोधी कारवाई:**

स्थानिक गुन्हे शाखेच्या चिमूर पथकाने रामनगर पोलीस स्टेशन अंतर्गत प्रगती नगर, बंगाली कॅम्प (चंद्रपूर) येथे छापा टाकून आरोपी आदित्य वासुदेव मडावी (वय २६) याला गांजा सेवन करताना रंगेहात पकडले. त्याच्याकडून गांजा पिण्याचे साहित्य जप्त करून त्याच्याविरुद्ध रामनगर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदा (NDPS Act) १९८५ च्या कलम २७ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**कारवाई करणारे पथक:**

सदर सर्व धडक कारवाया पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक श्री ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री अमोल काचोरे, स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेतील विविध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीरीत्या केली आहे. जिल्ह्यात अवैध धंदे करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कडक कारवाई सुरू राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## नागरिकांना आवाहन:-

आपल्या आसपास परिसरात सुरु असलेल्या अवैध धंद्याबाबत माहिती असल्यासए त्वरीत नजीक चे पोलीस स्टेशन किंवा पोलीस नियंत्रण कक्ष चंद्रपूर येथील टोल फ्री क्रमांक ११२ वर कॉल माहिती देवून पोलीसांना सहकार्य करावे.